संपादकीय

# नागरी सहकारी पतसंस्थांना कर्जमाफी योजना लागू नाही ?

देशातील शेतकऱ्यांच्या थकबाकी झालेल्या कर्जमाफी संदर्भात केंद्र सरकारने एक महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करून अखेर निर्णय घेतलेला आहे. केंद्र शासनाची शेतकऱ्यांच्या थकीत झालेल्या कर्जाच्या माफीची योजना शेतकऱ्यांना थेट लागू आहे. तशीच शेतीविषयक गुंतवणूकीसाठी घेतलेल्या कर्जाचाही त्यात समावेश आहे. ज्या गोष्टीचा संबंध थेट शेतीशी येत नाही, अथवा ज्या गोष्टी ''आवश्यक'' या सदरात मोडत नाहीत, अशा गोष्टींचा समावेश या कर्जमाफी योजनेत नाही.

शेतावरचे घर आणि शेतकऱ्याचे घर (फार्म हाऊस आणि फार्मर्स हाऊस) यामध्ये सुध्दा या योजनेत टिप्पणी केलेली आहे. फार्म हाऊससाठी घेतलेल्या कर्जाचा या योजनेत समावेश नाही. तसेच ही योजना शेतकऱ्यांसाठीच लागू असल्याने, एखाद्या कंपनीने किंवा सहकारी संस्थेने घेतलेल्या शेती कर्जाला ही योजना लागू नाही.

एका शेतकऱ्यास किती थकित कर्ज माफ होणार आहे ? त्यासाठी जमिनीचे क्षेत्र किती ? याबाबत वेळोवेळी वेगवेगळी माहिती प्रसिध्द होत असल्यामुळे याबाबत या ठिकाणी भाष्य करणे योग्य होणार नाही.

या कर्जमाफी योजनेमध्ये केंद्रसरकारची भूमिका व राज्यसरकारची भूमिका यात वेळोवेळी माहिती व आकडेवारीमध्ये संभ्रमच दिसतो आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी झाली नाही, अशांना कर्जमाफी योजना लागू आहे काय ? तसेच केवळ थकबाकी रकमेसाठी ही योजना आहे, याबाबत सुध्दा प्रत्येकवेळी वेगवेगळी विचारप्रणाली विविध माध्यमातून प्रसारित झालेली आहे. त्यामुळे या कर्जमाफी योजनेबाबत सर्वसामान्य शेतकरी व सर्वसामान्य जनता पुर्णपणे अंधारात आहे. कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयात सर्वसामान्याला या योजनेबाबत अधिकृत व छापील सही शिक्क्यानिशिचे धोरण पुस्तिका राज्यात कुठेही उपलब्ध करून देत नसल्याचे चित्र सर्वत्र दिसते. आणि याचाच परिणाम म्हणजे विविध राजकिय पक्ष या कर्जमाफी योजने संदर्भात प्रत्येक वेळी आपल्या सोयीनुसार शेतकऱ्यांचे आर्थिक हित जपण्याच्या संदर्भात आपापली भूमिका आपापल्या पध्दतीने प्रदर्शीत करताना दिसतात. त्यामुळे सर्वसामान्य जनता या कर्जमाफीच्या एवढ्या मोठ्या प्रचंड योगदानाबद्दल व क्रांतिकारक निर्णयाबद्दल सुध्दा केंद्र व राज्यसरकारच्या भूमिकेवर सकारात्मक बोलताना दिसत नाहीत. किंबहुना तसे बोलावे यासाठी सरकारचे धोरण व सत्तारूढ पक्षातील लोकप्रतिनिधींची भूमिका शेतकऱ्यांच्या ह्या प्रश्नाच्या बाबतीत अत्यंत उथळ वाटते. मतांच्या राजकारणाची सुध्दा सत्ताधारी नोंद घेण्यास तयार नाहीत. राज्यातील सर्वसामान्यांना गृहीत धरून **''काही केले तरी राज्यातील सामान्य जनता आपल्याला वरचे माप बहाल करील असे वाटते.''** परंतु सत्ताधाऱ्यांचा याबाबत फाजील आत्मविश्वास वाटतो.

राज्यात एकूण १ लाख ८० हजार विविध प्रकारच्या सहकारी संस्था असून, त्यामध्ये २७ हजारांच्या वर नागरी सहकारी पतसंस्थांचा समावेश आहे. आणि या पतसंस्थांमध्ये राज्यातील सर्वसामान्य लाखो जनांनी ३५ हजार कोटी रूपयांच्यावर ठेवीरूपाने रकमा गुंतविल्या आहेत. जवळ-जवळ साडेपाच लाख बेरोजगारांना व गरजू व्यक्तिंना या पतसंस्थांनी सेवेत समाविष्ट करून घेतले आहे. आणि जवळ-जवळ ३ लाख कार्यकर्ते या पतसंस्थांचे

नेतृत्व करीत आहेत. आणि अशा परिस्थितीत या **पतसंस्थांकडे मात्र प्रामुख्याने राज्य सरकार तिरक्या नजरेने बघत आहे.** कारण पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या नेतृत्वाबद्दल राज्यकर्त्यांमध्ये परिणामकारक मत आजपर्यंत तयार झालेले नाही. जर या ३ लाख नेतृत्वाने पतसंस्थांवर होत असलेल्या दुजाभाव भूमिकेमुळे राज्यकर्त्यांच्या विरोधात निवडणुकांच्या वेळी जर विरोधी भूमिका स्विकारली तर, राज्यातले राज्यकर्ते कुठे निवडून आले हे शोधावे लागणार आहे, यावर राज्यकर्त्यांना अद्याप पुरावा मिळालेला नाही. शिवाय पतसंस्थांमधील कार्यकर्ते राज्यकर्त्यांच्या विरोधात मतदारांना विरोधी मतदान करण्यासाठी पुढाकार घेतील, असे बिलकूल वाटत नाही. काही केले तरी पतसंस्थांमधील हे ३ लाख नेतृत्व करणारे कार्यकर्ते हे राज्यकर्त्यांबरोबर निवडणुकांच्या वेळी सक्रिय राहतील, असेच त्यांना वाटते. आणि म्हणून या पतसंस्थांना या कर्जमाफी योजनेमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी आपले धोरण अधिकृतपणे जाहिर करून केंद्रशासनाच्या या मुळ धोरणात आवश्यकता असेल तसा बदल करावासा वाटत नाही,त्याचे कारणही वरीलप्रमाणे आहे.

राज्यातील साखर कारखान्यांना मात्र हे राज्य सरकार जनतेचे पैसे ''शेतकऱ्यांच्या हिताच्या नावाखाली'' विविध माध्यमातून कधी बिनव्याजी, कधी कमी व्याजाने, कधी मदतरूपाने, कधी करात सवलत अशा अन्य विविध मार्गाने डुबविलेल्या साखर कारखान्यांना कायद्यामध्ये बसवून मदत करीत आलेले आहेत. प्रसंगी नाबार्ड, रिझर्व्ह बँक यांच्याशी संधान साधून **संपुर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला कोंडीत पकडून ज्यांनी शेतकऱ्यांना कारखाना स्थापनेपासून लुटलेले आहे, रोज लुटत आहेत, स्थापनेपासून हे कारखाने तोट्यातच आहेत, ऊसाच्या बिलातून देय नसलेल्या रकमा कापल्या जात आहेत, बेकायदेशीररित्या कापलेल्या ठेवींवर नियमीतपणे व्याज सुध्दा दिले जात नाही. व या तथाकथित मुदत संपलेल्या ठेवीसुध्दा शेतकऱ्यांना त्या-त्या वेळेत परत दिल्या जात नाहीत, शासनाची कपात केलेली रक्कम सुध्दा शासनाला देत नाहीत.** असे हे सहकारी साखर कारखाने यांना मात्र हे सरकार करोडो रूपयांची खैरात करते. **कारण हेच कारखानदार जिल्हा परिषद व राज्य सरकारमध्ये बसलेले आहेत.** आणि त्यांच्या ह्या कारखान्यांना जर मदत केली नाही, तर ते सरकार पाडतील, या कारणास्तव जनतेच्या पैशांवर यांच्यामार्फत रोज दरोडा टाकला जातो. आणि या विदारक सत्त्याचा नजिकच्या काळात स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही, असेच चित्र व कटु सत्त्य सर्वत्र दिसते.

म्हणून पतसंस्थांना या कर्जमाफी योजनेत सामिल करून घेतले जात नाही. हजारो लोकांच्या जनसमुदायासमोर मात्र हे सत्ताधारी नागरी सहकारी पतसंस्थांना ही कर्जमाफी योजना लागू होईल असे **''चेष्टा केल्यासारखे''** भाषणात बोलतात. परंतु नंतर मात्र नाबार्डवर ढकलून हे राज्यकर्ते आपल्या पतसंस्थांना मात्र निश्चितपणे फसविणार आहेत. **राज्य सरकार म्हणून आम्ही तयार होतो, परंतु केंद्रसरकारच्या अखत्यारित असलेले नाबार्ड मात्र नागरी सहकारी पतसंस्थांना ही योजना लागू करू देत नाही, असे बोलून नामनिराळे व्हायचे असा एकंदरीत डाव आहे.** आणि हा डाव राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या ३ लाख नेतृत्वाने कुठल्याही परिस्थितीत हाणून पाडला पाहिजे. एवढेच नव्हे तर या कर्जमाफी योजनेत जर नागरी सहकारी पतसंस्थांना समाविष्ट करून घेतले नाही, तर पतसंस्थांना आर्थिकदृष्टया नेस्तनाबूत करणाऱ्यांच्या विरोधातप्रत्यक्ष कृतीने चोख उत्तर देण्यासाठी आपापल्या स्तरावर जाणिवपुर्वक प्रयत्न करायला हवेत.तर आणि तरच येणारा प्रत्येक राज्यकर्ता नागरी पतसंस्थांच्या बाबतीत ''तिरकी चाल'' व ''कमी लेखण्याचे काम'' करण्याचे धाडस करणार नाही.

पतसंस्थांनी ही पतसंस्थांची सर्वसामान्यांची चळवळ राजकिय प्रवाहात मतदानावर परिणामकारक ठरविण्यासाठी प्रत्यक्ष लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यासाठी जिवाची बाजी लावणे आवश्यक आहे. **वैद्यनाथ कमिटीचा अहवाल सुध्दा राज्यसरकाने स्विकारलेला आहे.** आणि त्या अनुषंगाने **राज्य बँक, जिल्हा बँक व प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांचा सव्वा कोटी रूपयांचा शिक्षणनिधी सुध्दा महाराष्ट्र राज्य सहकारी संघास न देण्याचे कायद्यात रूपांतर करून फार मोठे पाप सरकारने केलेले आहे.** कारण वैद्यनाथ कमिटीच्या शिफारशीनुसार व त्या अनुषंगाने कायद्यात दुरूस्ती केल्यामुळे राज्यसरकारला १५ हजार कोटी रूपयांच्यावर पॅकेज मिळणार आहे, त्यापैकी केवळ सव्वाकोटी रूपये राज्यातील सहकारी संस्थांना शिक्षण-प्रशिक्षण देण्याऱ्या संस्थेच्या उत्पन्नातून घट करण्याचे कुकर्म राज्यकर्त्यांनी करावे, यासारखी लाजिरवाणी गोष्ट या राज्यात झाली नाही. आणि याचे दुष्परिणाम राज्यातील सहकारी संस्थांवर व प्रामुख्याने शेतकऱ्यांचा प्रमुख कणा असलेल्या प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांवर होणार आहे. कारण राज्यसरकारची कुठलीही यंत्रणा या प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांपर्यंत कर्जाव्यतिरिक्त पोहोचत नाही. परंतु महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व त्याची राज्यातील सर्व घटक कार्यालये या पतसंस्थांकडे नियमितपणे शिक्षण-प्रशिक्षणाच्या कारणास्तव पोहोचतात व त्यांना त्यामुळे आत्तापर्यंत आर्थिक सक्षमतेचे शिक्षण-प्रशिक्षण दिले जाते. आणि ते सुध्दा कायद्यातील वरील तरतुदीमुळे या सरकारने काढून घेतले. त्यामुळे या पतसंस्था म्हणजेच शेतकऱ्यांचे प्रत्येक गावात असलेल्या प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था पुर्णपणे आणखी आर्थिकदृष्टया कमकुवत करण्याचे काम राज्यकर्ते करणार आहेत. आणि ही भावना हळूहळू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत आहे.

एकंदरीत राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांना केंद्रसरकारच्या कर्जमाफी योजनेतून जाणिवपुर्वक दूर ठेवणे याचे विपरित परिणाम भविष्यामध्ये जर भोगायचे नसतील, तर त्यांनी या पतसंस्थांना केंद्रसरकाच्या कर्जमाफी योजनेत समाविष्ट करण्यासाठी सर्वस्तरावर आपली भूमिका दुरुस्त करणे आवश्यक आहे. अन्यथा यासर्व गोष्टींना भविष्यकाळच उत्तर देईल. व राज्यकर्त्यांना या छोट्याशा चुकीचा पस्तावा झाल्याशिवाय राहणार नाही. इतकेच.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**